नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/09/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ४ ट्रक आणि ०२ टिप्परवर कारवाई करून एकुण ०१ कोटी ११ लाख ३८००० रूपयाचा मुद्देमाल जप्त पोलीस स्टेशन रामटेकची कारवाई

दि. ०४/०९/२०२३ रोजी मा. पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांचे आदेशाने परि. सहाय्यक पोलीस अधिक्षक अनिल मस्के सा. प्रभारी पोलीस स्टेशन कुही, स्टॉफ सह नागपुर ग्रामीण जिल्हा पोस्टे रामटेक येथे पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन रामटेक हद्दिमध्ये पेट्रोलींग दरम्यान मुखबीरद्वारे मिळालेल्या माहितीवरून अवैधरित्या विनापरवाना रेतीची वाहतुक होत आहे. या माहिती वरून स्टाफसह तुमसर रामटेक बायपास हायवे रोडवर सनशाईन हॅटेल जवळ थांबले असतांना दि. ०४/०९/२०२३ चे ०६.३० वा. दरम्यान विनापरवाना रेतीची चोरुन वाहतुक करतांना १) एल. पी (१६ चक्का ट्रक) क्रमांक एम. एच.–३२/ए.जे.–७७७२ किंमती २५,००,०००/–रू. व अंदाजे १० ब्रास रेती ३०००/– रू. प्रति ब्रास प्रमाणे ३००००/–रू. प्रमाणे २५,३००००/– रू. चा मुद्देमाल एल. पी (१६ चक्का ट्रक) चालकाचे ताब्यातुन तसेच २) एल.पी (१६ चक्का ट्रक) क्रमांक एम. एच.–२७./बि.एक्स.–७९८६ किंमती २५,००,०००/–रू. व अंदाजे १० ब्रास रेती ३०००/– रू. प्रति ब्रास प्रमाणे ३००००/–रू. प्रमाणे २५,३००००/– रू. चा मुद्देमाल एल. पी (१६ चक्का ट्रक चालकाचे ताब्यातुन तसेच ३) एल. पी (१४ चक्का ट्रक) क्रमांक एम. एच.–४०/बि.जी.–६६९३ किंमती २०,००,०००/–रू. व अंदाजे ८ ब्रास रेती ३०००/– रू. प्रति ब्रास प्रमाणे २४,०००/–रू. प्रमाणे २०,२४०००/–रू. चा माल एल.पी (१४ चक्का ट्रक चालकाचे ताब्यातुन तसेच ४) एल. पी (१४चक्का ट्रक) क्रमांक एम.एच.४०.बी.जी.–६४१३ किंमती २०,००,०००/–रू. व अंदाजे ८ ब्रास रेती ३०००/– रू.प्रति ब्रास प्रमाणे २४०००/–रू. प्रमाणे २०,२४०००/–रू. चा मुद्देमाल एल.पी (१४ चक्का ट्रक चालकाचे ताब्यातुन तसेच घटनास्थळावरून पळुन गेलेले टिप्पर (१० चक्का ट्रक) क्रमांक एम. एच. –४९/ए.टी.–४७२२ किंमती १०,०००००/– रू. व अंदाजे ५ ब्रास रेती ३०००/– रू. प्रति ब्रास प्रमाणे किंमती १५०००/– रू. एकुण १०,१५०००/– रू. तसेच दुसरा टिप्पर (१० चक्का ट्रक) क्रमांक एम. एच.–४०/बि.एल. –७०९९ किंमती १०,०००००/–रू. व अंदाजे ५ ब्रास रेती ३०००/– रू. प्रति ब्रास प्रमाणे किंमती १५०००/– रू. एकुण १०,१५०००/– रू. चा मुद्देमाल पळुन गेलेल्या चालकाचे वाहनातुन जप्त करण्यात आला. असा एकुण १,११,३८,०००/– रूपयाचा मुद्देमाल मिळुन आल्याने **आरोपी नामे १) ज्ञानेश्वर प्रेमदास महिंद वय ३७ वर्ष रा.मांदेड ता. लाखंदुर जि. भंडारा ह. मु. शिक्षक कॉलनी चाणक्य शाळा पाणेचे टंकी जवळ वर्धा २) मोहम्मद सोहेल अब्दुल राजीक वय ३० वर्ष रा.काझी पुरा चांदुर बाजार जि.अमरावती ३) अफसर खाण अताउल्ला खान वय ४० वर्ष रा. सेवादल नगर नागपुर गेट अमरावती ४) अनिल रामलाल सोनटक्के वय ४५ वर्ष रा.जमुनिया ता.शिवनी जि. शिवनी** तसेच फरार टिप्पर क्रमांक एम. एच. –४९/ए.टी.–४७२२ चालक व टिप्पर क्रमांक एम. एच.–४०/बि.एल.–७०९९ चा चालक असे दोन्ही चालक हे त्यांचे ताब्यातील ट्रक व टिप्परमध्ये अवैधरित्या विनापरवाना चोरीची रेती वाहतुक करतांना मिळुन आल्याने त्यांचे विरूद्ध कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करुन तपासात घेतला.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष ए. पोद्दार सर (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले सर यांचे मार्गदर्शनात परि. सहाय्यक पोलीस अधिक्षक अनिल मस्के सा. प्रभारी

पोलीस स्टेशन कुही, पोलीस स्टेशन रामटेक येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक हृदयनारायण यादव, पोलीस शिपाई हिवराज लांजेवार, रविंद्र मारबते, उमेश ठवकर, कार्तिक थेटे, पियुश वाढीवे यांचे पथकाने केली.

## घरफोडी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत १२ किमी अंतरावर आजनगांव जिचकार येथे दिनांक ३१/०८/२०२३ चे १२.०० वा. ते १७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— बाबाराव जानबाजी कांबळे, वय ६० वर्ष, रा. वार्ड क्र. २ आजनगांव यांचे नातु आरोपी नामे— अमित हिरामन कांबळे रा. आजनगांव ता. काटोल याने घराचे खिडकीमधुन घरात प्रवेश करून आलमारीचे लॉकरमध्ये ठेवलेले ३०,०००/— रूपये व सोन्याची पोत ८ पोहळे मनी, २२ पिटीव मनी व ५ ग्रॅमचे पदक असलेली गरसोळी १२,०००/— रूपये किंमतीचे ३.५ ग्रॅम वजनाचे २ नग सोन्याचे कानातील टापसे आणि २,५००/— रूपये रोख असे एकुण ४४,५००/— रूपये किंमतीचा मुद्देमाल आरोपीने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रभुदास दलाल मो. नं. ९५६१५६४८५२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**